## RTE Act-2009 अंतर्गत
## शाळा मान्यता (नमुना-दोन)

जावक क्र.:- जि.प.चं.प्रा./RTE/शा.मा./397/2023 | दिनांक :- 11/05/2023

जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचे कार्यालय,
जिल्हा - चंद्रपूर, राज्य - महाराष्ट्र
दुरध्वनी :- 07172-252560
ई मेल :-eopzpchandrapur@gmail.com

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
विजयकिरण मॅनेजमेंट एज्युकेशनल इस्टिटयुट, नागपूर.

**विषय -** **बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 याच्या नियम 11, पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ -** 1) शासन पत्र क्र - SFS- 1021/प्रक्र/1073/ एसएम- 2, दिनांक 03/02/2023
2) कार्यालय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचे पत्र क्र. माध्य/ब/ स्वअर्थ/ 2488/2023 दि. 30/03/2023
3) मुख्याध्यापक, स्टेम (STEM) पोदार लर्न स्कुल तुंबडी मेंढा, ता. ब्रम्हपुरी यांचे पत्र दिनांक 29/04/2023
4) गटशिक्षणाधिकारी, प.स. ब्रम्हपुरी यांचा शाळा तपासणी अहवाल दिनांक 29/04/2023

**महोदय/महोदया,**

संदर्भ पत्र क्र. 1 व 2 नुसार **विजयकिरण मॅनेजमेंट एज्युकेशनल इस्टिटयुट, नागपूर.** व्दारा संचालित **स्टेम (STEM) पोदार लर्न स्कुल तुंबडी मेंढा, ता. ब्रम्हपुरी** या ईंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळेला, **सन 2023-24** पासुन, नविन शाळा **प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता 1 ते 12 वीचे वर्ग, सर्व शाखा, ईंग्रजी माध्यम,** CBSE) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम, 2012 अन्वये स्वंयअर्थसहाय्यीत तत्वावर अटि व शर्तिवर सुरु करण्याकरिता परवानगी दिलेली आहे. संदर्भ क्र. 3 नुसार, शाळेचे मुख्याध्यापकांनी शाळेला पुढिल कालावधीसाठी RTE Act-2009 अंतर्गत शाळा मान्यता (नमुना-दोन) देणेबाबत प्रस्ताव प्रथमच सादर केलेला आहे.

संदर्भ क्र. 4 नुसार, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, ब्रम्हपुरी यांनी सदर शाळेची तपासणी करून अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. त्या अहवालानुसार सदर शाळेत सद्या **इयत्ता 1 ते 7** चे वर्ग उपलब्ध आहेत. तसेच सदर शाळा RTE Act-2009 मधील भौतिक सुविधांच्या मानकांची पूर्तता करीत असल्यामूळे शाळेला मान्यता प्रदान करण्याकरीता शिफारस केलेली आहे. त्याआधारे **दिनांक 03/04/2023 पासून दिनांक 02/04/2026** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता 1 ते 7** करीता **स्टेम (STEM) पोदार लर्न स्कुल तुंबडी मेंढा, ता. ब्रम्हपुरी** या शाळेस खालील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून शाळा मान्यता (नमुना-दोन) प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे-**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतूदीचे, शाळा पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल. परंतु आणखी असेकी, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात, किंवा वंश, जन्म ठिकाणकिंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणारनाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत काढून टाकण्यात येणार नाही.
   (दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
   (तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
   (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित प्रमाणपत्र देण्यात येईल.
   (पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यातयेईल.
   (सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारणकरणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. आणखी असेकी, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारणन करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारेतयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
9. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.

<u>तपासणी अहवालानुसार शाळेत खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध आहेत-</u>

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ- 12100 **चौ.मी.**
- एकूण बांधकाम क्षेत्रफळ - 4639.71 **चौ.मी.**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - 3922.98 **चौ.मी.**
- वर्गखोल्यांची संख्या - 23
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली आहे काय ? - **आहे.**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधन गृहे आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेलअशी व्यवस्था आहे काय ? - **आहे (कमोड आहे.)**
- पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे काय ? - **आहे.**
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर - **नाही (लागु नाही)**
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडा विषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता आहे काय ? - **आहे.**
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध आहे काय ? - **आहे.**
- सर्व सूविधा विना अडथळा (रॅम्प) उपलब्ध आहेत काय? - **आहे.**
- शाळेलासंरक्षण भिंत आहे काय? - **आहे.**
- शाळेत अग्निशमन यंत्र आहे काय? - **आहे.**

11. शासनाची मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनि विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्ये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखा परिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.
16. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक 27131120901 असा आहे, हा सांकेतांक या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.
17. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणीकरतील असे अहवाल व माहिती शाळेनेसादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रूटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणी चे कोणतेही नूतनीकरण असल्यास, नूतनीकरण केल्याची सुनिश्चितता करावी.
19. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम - 2009 प्रमाणे शाळेला आवश्यक असणा-या बाबी पूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच संदर्भिय तपासणी अहवालाच्या आधारे व अपूर्ण असलेल्या भौतिक सुविधांच्या **मानकांची पूर्तता तिन महिन्याचे आत पूर्ण करण्याचे अटीवर** शाळेला हे शाळा मान्यता (नमुना-दोन) प्रदान करण्यात येत आहे. परंतू प्रत्यक्ष फेरतपासणीच्या वेळी कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळून आल्यास तथाअपुर्ण मानकांची पूर्तता मुदतीत न केल्यास **सदर शाळा मान्यता (नमुना-दोन) त्यापूढे आपोआप संपूष्टात येईल, हयाची कृपया नोंद घ्यावी.**

**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**

**प्रतिलिपी** :- 1. मुख्याध्यापक, **स्टेम (STEM) पोदार लर्न स्कुल तुंबडी मेंढा**, पंचायत समिती, **ब्रम्हपुरी** यांना माहितीस अग्रेषीत.

2. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, **ब्रम्हपुरी** यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषीत. सदर शाळा मान्यता नमुना- दोन चे प्रमाणपत्र संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / अध्यक्ष/ सचिव यांना पोहोचते करुन पोच घ्यावी. व पोचपावती या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

-स्वा-

**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**

PRINCIPAL
STEM PODAR LEARN SCHOOL,
TUMBDI MENDHA,
BRAMHAPURI

# SCHOOL RECOGNITION

## UNDER RTE ACT – 2009 (SAMPLE – TWO)

Outwords No. Z.P.C.Pra/RTE/S.M/397/2023
Office of the District Education Officer (Primary)
District – Chandrapur, State – Maharashtra.

Date :- 11/05/2023
Phone:- 07172-252560
Email. eopzchandrapur@gmail.com

To,

Chairman/Secretary,
Vijaykiran Management Educational Institute, Nagpur.

**Subject** :- **For the purpose of Section 18 of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, regarding the granting of Recognition Certificates to school under Rule 11, sub – rule (4) of the Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011.**

**Reference** :-
1. Government Letter No. SFS – 1021/Prakr/1073/SM – 2 dated 03/02/2023.
2. Office of the Deputy Director of Education, Nagpur letter no.Madhya/B/ Swarth/2488/2023 dated 30/03/2023.
3. Principal, STEM Podar Learn School Tumbdi Mendha, Bramhapuri Letter dated 29/04/2023.
4. Block Education Officer, Panchayat Samiti Bramhapuri School Inspection Report of Bramhapuri dated 29/04/2023.

Respected Sir/Madam,

Reference Letter No. 1 & 2 as per **Vijaykiran Management Educational Institute, Nagpur by STEM Podar Learn School Tumbdi Mendha, Tah. Bramhapuri, Distt. Chandrapur.** An English Medium Private School, from the year 2023 – 2024 will be a New School from Primary to Higher Secondary (Classes 1 to 12 All Streams, English Medium, CBSE) on Self – Financing basis under the Maharashtra Self – Financing Schools (Establishment and Regulation) Act, 2012. Permission is given to start on condition. Reference No. As per 3, the Headmaster of the school proposes for the first time to grant school recognition under RTE Act 2009 (Sample – Two) to the school for the next period is presented.

Reference No. As per 4 the Block Education Officer, Panchayat Samiti, Bramhapuri inspected the said school and reported to this office is presented. According to that report, the school currently has classes from 1st to 7th standard. It is also recommended to grant recognition to the school as it meets the standards of physical facilities in RTE Act – 2009. Accordingly for a period of three years from 03/04/2023 to 02/04/2026 STEM Podar Learn School Tumbdi Mendha, Tah. Bramhapuri, Distt. Chandrapur. School Recognition (Specimen – Two) Certificate is being granted to Bramhapuri subject to the fulfillment of the following terms and conditions. The above recognition

**Is Subject to the fulfillment of the following conditions:-**

1. The period or recognition shall not be extended and there shall be no obligation under any circumstances to grant recognition or affiliation after class VIII.
2. Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 (Annexure One) and Maharashtra Children's to Free and Compulsory Education Act, 2009. The school shall comply with the provisions of the Right to Education Act, 2011 (ScheduleTwo).
3. The School shall admit children belonging to the nearest weaker sections and deprived groups, to the extent of at least 25% of the number of students in the first grade and shall provide free and compulsory education to them till the completion of primary education. But more so, Pre – Primary. This standard will also be followed in the matter of grades.
4. Reimbursement that the school receive in terms of section 12 (2) of the Act for the children specified in paragraph 3. A separate bank account will be provided to the school for receiving.
5. The institution/school shall not charge any capitation fee and shall not charge the child or his or her for any screening process. Parents or guardians will not be forced.
6. Any child for want of proof of age, religion, caste or race, place of birth or for any of these reasons. Admission to the school will not be denied.
7. (i) No child admitted to a school shall be retained in the same grade as he belongs; or Can't be removed till completion of primary education.

   (ii) No child shall be subjected to corporal punishment or mental torture.

   (iii) No child shall be required to pass an board examination until he has completed his primary education.

   (iv) Every child who has completed primary education shall be given the certificate prescribed under rule 23.

   (v) Students with disabilities/special needs will be included a per the provisions of the Act.

   (vi) Teachers possessing the minimum qualification prescribed under section 23 (1) of the Act shall be appointed. Further, teachers holding minimum qualification on the date of commencements of the Act will have to acquire such minimum qualification within a period of 5 years.

   (vii) The teacher shall perform his/her duties specified in section 24 (1) of the Act.

   (viii) The school shall ensure that the teacher does not engage himself in private tutoring.

8. The school shall follow the curriculum based on the syllabus prescribed by the appropriate authority.
9. The school shall admit students against the facilities available in the school as prescribed in section 19 of the Act.
10. The school shall adhere to the standards and norms specified in section 19 of the Act.

**According to the inspection report the following facilities are available in the:-**

| | | |
|---|---|---|
| • School – Area of the school premises | - | 12100 Sq. M. |
| • Total construction area is | - | 4639.71 Sq. M. |
| • Area of Playground | - | 3922.98 Sq. M. |
| • Number of Classrooms | - | 23 |
| • Is there an office – tore room – principal's room? | - | Yes |
| • Separate toilet facilities for boys and girls – where adequate for use and keeping toilets and sanitary is there a system to have water? | - | Yes (Commode - Yes) |
| • Is there drinking water facility? | - | Yes |
| • Kitchen for cooking lunch | - | Not Applicable |
| • Is teaching study material/sports and sports material /Library are they available? | - | Yes |
| • Reading material available free of cost? | - | Yes |
| • Are CI facilities barrier – free (Ramp) accessible? | - | Yes |
| • Does the school have a protective wall? | - | Yes |
| • Does the school have a fire extinguisher? | - | Yes |

11. Classes or classes not approved by the Government shall not be conducted in the school premises or elsewhere in the name of the school.
12. The school building or other structure or playground shall be used only for the purpose of education and skill development.
13. The school is run by a body registered under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860) or the Bombay Public Trustee System Act, 1950.
14. School for the benefit or any profit of any person, group or association of persons or any other person not run to get.

15. The accounts of the school should be audited and certified by a Chartered Accountant and proper accounts should be prepared as per rules. A copy of each account statement should be sent to the District Education Officer every year.
16. It may be noted that the approval number of your school is 27131120901, please mention this number in any correspondence with this office.
17. The school shall submit such reports and information as may be required from time to time by the Director of Education/District Education Officer or the Government or local authority for the continued fuwillment of the condition of recognition of the school or for rectifying the deficiencies in the functioning of the school. Follow the instructions given.
18. If there is any renewal of the registration of the organization, it should be ensured that the renewal is done.
19. The school must fulfill the requirements as per the Right of Children to Free and Compulsory Education Act Also, this School Approval (Sample – Two) is being granted to the school on the basis of the reference inspection report and on the condition that the standards of the incomplete physical facilities are completed within three months. However, if any kind of errors are found during the actual re – examination and if incomplete standards are not met with in the time limit, the said school accreditation (Sample – Two) will be automatically terminated before the please note this.

**Education Officer (Primary)**
**Zillha Parishad, Chandrapur**

Copy :-

1. Forwarded to Principal, STEM Podar Learn School Tumbdi Mendha, Bramhapuri, Panchayat Samiti, Bramhapuri.
2. Forwarded to Block Education Officer, Panchayat Samiti, Bramhapuri for information and appropriate action. The said School Recognition Form – Certificate of (Sample – Two) should be sent to the Principal/Chairman/Secretary of the concerned school and should be acknowledged. And the acknowledgment should be submitted to this office immediately.

**-Self-**
**Education Officer (Primary)**
**Zillha Parishad, Chandrapur**

NOTARIAL REGN.
No. 2711/2023
DATE 25/08/2023

NOTARY
G. B. BHENDARKAR
BRAMHAPURI
Regn. No. 3465
GOVT. OF INDIA

**BEFORE ME**

*Govind B. Bhendarkar*
NOTARY Reg. No. 3465
Bramhapuri
Dist Chandrapur-441206

Note . The Court Fee Stamp are affixed due to non availibility of Notarial Stamps in view of Rule 14 of Born Stamps Rules 1938 & Govt. GR No. Mudrank 2002/1060 GR 28/M1 dt. 08/04/02 of Revenue & Forest Dept. Mantralaya Mumbai.

Notary

20रु. Rs.20 INDIA बीस रुपये TWENTY RUPEES CANCELLED

PRINCIPAL
STEM PODAR LEARN SCHOOL,
TUMBDI MENDHA,
BRAMHAPURI